# पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८
# पशुवैद्यकीय विभाग
# लोखंडे कामगार भवन, खराळवाडी, पिंपरी-४११ ०१८

## पशुवैद्यकीय अधिकारी व लाईव्ह स्टॉक सुपरवायझर अभिनामाची पदे एकत्रित मानधनावर भरणेबाबत.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागासाठी पशुवैद्यकीय अधिकारी व लाईव्ह स्टॉक सुपरवायझर अभिनामाची पदे ६-६ महिने कालावधीसाठी एकत्रित मानधनावर नेमावयाची आहेत व प्रतीक्षा यादी तयार करावयाची आहे. तरी पदनिहाय शैक्षणिक अर्हता व अटी खालीलप्रमाणे

| अ. क्र | पदनाम | पद संख्या | एकत्रित मानधन | शैक्षणिक अर्हता/अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | पशुवैद्यकीय अधिकारी | १ | १०,०००/- | १) शासनाची मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.व्ही.एस.स्सी. अँण्ड एच.ए. परीक्षा उत्तीर्ण<br>२) एम.व्ही.एस.स्सी.(मेडिसीन) असल्यास प्राधान्य<br>३)शासकीय/निमशासकीय संस्थेतील कामकाजाचा अनुभव असलेस प्राधान्य |
| २ | लाईव्ह स्टॉक सुपरवायझर | २ | ६,०००/- | १) शासनाचे मान्यताप्राप्त संस्थेचा डेअरी डिप्लोमा अभ्यासक्रम अथवा लाईव्ह स्टॉक सुपरवायझर अभ्यासक्रम उत्तीर्ण.<br>२) बी.व्ही.एस.स्सी. अँण्ड एच.ए. परीक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य<br>३) शासकीय/निमशासकीय संस्थेतील कामकाजाचा अनुभव असलेस प्राधान्य |

**टिप -**

१. मानधनावरील नेमणुका पुर्णपणे तात्पुरत्या (हंगामी) स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास महापालिका आस्थापनेवर कोणत्याही कायम पदी नेमणुकीचा हक्क प्राप्त राहणार नाही.

२. ज्या दिवशी मनपास सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटिशीशिवाय त्यांच्या मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येतील.

३. अर्जासोबत अलीकडे काढलेले स्वतःचे दोन रंगीत फोटो जोडावे. तसेच लिफाफ्यावर संबधित पदासाठी अर्ज असे नमुद करावे.

४. जाहिरातीतील अ्.क्रं. १ पदासाठी महाराष्ट्र पशुवैद्यक कौन्सील कडील रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

५. अर्जासोबत अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६. मुलाखतीस येण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

७. उपरोक्त पदांना विहीत केलेनुसार मानधन अदा केले जाईल. सदर पदांची संख्या कमी/जास्त होण्याची शक्यता आहे.

तरी, इच्छुक व अर्हताधारक उमेदवारांनी दि. ०५ /०७/२०१० अखेरपर्यंत आपले अर्ज वरील पत्त्यावर आवश्यक त्या कागदपत्रांसह समक्ष सादर करावेत. मुदतीनतर समक्ष/पोस्टाद्वारे/कुरियरद्वारे प्राप्त झालेल्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही, याची स्पष्ट नोंद घ्यावी. सदर पात्र उमेदवारांच्या लेखी परिक्षा/मुलाखती दि. ०९/०७/२०१० सकाळी १०.०० वाजता वैद्यकीय विभाग, मुख्य कार्यालय, मुख्य प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, पिंपरी-४११ ०१८ येथे घेण्यात येतील. यासाठी उपस्थित राहणेकामी पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**सही/-**
**आयुक्त**
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८

**जाहिरात क्रं. ७८/२०१०**
क्रमांक - पवै/१/कावि/ /२०१०
दिनांक - /०६/२०१०